# अहिल्यानगर महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग

वेबसाईट : www.amc.gov.in
ई-मेल : amc_anr@rediffmail.com

जा.नं. शहर पा.पु. ३८२ दिनांक :- २५/०६/२०२५

प्रति,
मा. प्रसिध्दी विभाग प्रमुख,
अहिल्यानगर महानगरपालिका.

विषय- दि.२६/०६/२०२५ रोजी मुख्य जलवाहिनी दुरूस्तीच्या कामांसाठी घेण्यात येणाऱ्या शट डाउनमुळे शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगर भागास **एक दिवस विलंबाने पाणी पुरवठा होणार असले बाबत...**

महोदय,

विषयांकीत बाबत कळविण्यांत येते की, सोमवार दि.२३/०६/२०२५ रोजी मुळानगर ते विळद दरम्यानची मुख्य जलवाहिनीला तीन ठिकाणी गळती झाली होती. या गळतीद्वारे मोठया प्रमाणात पाणी वाया जात असल्या कारणाने सदरची दुरूस्ती ही त्याच दिवशी तातडीने घेण्यात आली. दुरूस्तीचे काम पूर्ण झालेनंतर पाणी पुरवठा सुरू केला असता दि.२४/०६/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता नागापूर परिसरात अज्ञात जे.सी.बी. ने मुख्य जलवाहिनीवरील एअर व्हॉलचे नुकसान केले. त्यामुळे या दुरूस्तीचे काम देखील तात्काळ हाती घेवून रात्री उशिरा पर्यंत पूर्ण केले. या कालावधी मध्ये शहराचा पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे.

शहराचा पाणी पुरवठा सुरळीत करत असतांना दि.२५/०६/२०२५ रोजी नांदगाव शिवारात ११०० एम.एम. व्यासाच्या मुख्य जलवाहिनीला गळती झाल्याचे निदर्शनास आले आहे. ही दुरूस्ती देखील त्वरीत करणे आवश्यक असल्याने दुरूस्तीचे काम हे दि. २६/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्याचे नियोजित करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरची मुख्य जलवाहिनीद्वारे होणारा पाण्याचा उपसा बंद राहणार आहे.

त्यामुळे गुरूवार दि.२६/०६/२०२५ रोजी बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड, लक्ष्मीनगर, सुर्यनगर, निर्मलनगर, मुकूंदनगर तसेच केडगाव, नगर-कल्याण रोडवरील शिवाजीनगर परिसर इ. भागास [सकाळी ११.०० नंतरच्या पाणी वाटपाच्या भागास] पाणी पुरवठा होउ शकणार नाही. सदरचा पाणी पुरवठा हा शुक्रवार दि.२७/०६/२०२५ रोजी करणेत येईल.

तसेच शुक्रवार दि.२७/०६/२०२५ रोजी रोटेशन नुसार पाणी वाटपाच्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळू बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी या भागात व गुलमोहर रोड, प्रोफेसर कॅालनी परिसर, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, टी.व्ही. सेंटर परिसर, म्युनिसीपल हाडको इत्यादी भागात महानगरपालिके मार्फत पाणी पुरवठा करण्यात येणार नाही, या भागातील पाणी पुरवठा हा शुक्रवार ऐवजी शनिवार दि.२८/०६/२०२५ रोजी करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

शनिवार दि.२८/०६/२०२५ रोजी पाणी पुरवठा होवू घातलेल्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफखाना, दिल्लीगेट, नालेगाव, चितळे रोड, आनंदी बाजार, कापड बाजार, ख्रिस्त गल्ली, पंचपीर चावडी, जुने म न पा कार्यालय परिसर, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर, व सावेडी इत्यादी भागात पाणी पुरवठा होणार नसून तो रविवार दि.२९/०६/२०२५ रोजी करण्यात येईल.

शहरातील पाणी पुरवठा एक दिवस बंद करून उपनगरात ज्या भागात जास्त दिवसाचे रोटेशन आलेले अशा भागात पाणी पुरवठा करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

तरी नागरीकांनी याची नोंद घेवून असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करून महानगरपालिकेस सहकार्य करावे. अशा प्रकारची प्रेस नोट वर्तमानपत्रात प्रसिध्द करावी.

जल अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका

प्रत : मा.आयुक्त तथा प्रशासक, अहिल्यानगर महानगरपालिका यांचे माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा उपायुक्त (कर), अहिल्यानगर महानगरपालिका यांचे माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner